## २००५ मधील अतिवृष्टी व पूराच्या आपत्तीनंतर

# सरकारकडून झालेला जनतेचा अपेक्षाभंग

## शासकीय पातळीवर पाठपुरावा करण्यासाठी लोकप्रतिनिधींना निवेदन


### आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या प्रक्रियेत दिरंगाई व लोकसहभागाचा अभाव

आपत्ती व्यवस्थापनात आमुलाग्र सुधारणेसाठी केंद्रीय कायदा संमत झाला तरी राज्याच्या कायद्याचा अजून मसुदा नाही आणि त्या प्रक्रियेत लोकसहभागही नाही . . . . . . . . . . . . . . . . . या विषयी पान क्र.१

### भात शेतीचे पुनर्वसन

२००५ च्या अतिवृष्टीत भातशेतीच्या जमीन दुरुस्तीचे धोरण जाहीर करुन सुध्दा प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांच्या शेतजमिनी अजूनही नापीक अवस्थेत. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . या विषयी पान क्र. ३

### बेघर झालेल्या आपत्तीग्रस्तांचे पुनर्वसन

अतिवृष्टीत घरांचे नुकसान झालेल्या कुटुंबांसाठी पुनर्वसनाचे अंदाजपत्रक तयार असूनसुध्दा शासनाने प्रत्यक्षात काहीच न केल्यामुळे ऐन पावसाळ्यात अनेक कुटुंबे उघड्यावर . . . . . . . . .या विषयी पान क्र. ४

### आपत्तीमागच्या मूळ कारणांवर कायमस्वरुपी उपाय

कोकणात व इतर ग्रामीण भागात मानवी हस्तक्षेपासारख्या मूळ स्थानिक कारणांबाबत कोणतीच कार्यवाही शासनाने न केल्यामुळे आपत्ती पुन्हा येणाचा धोका. . . . . . . . . . . . . . . . .या विषयी पान क्र. ५

### आपत्ती काळात स्त्रियांचा सहभाग व विशेष गरजा

शासनाने आपत्तीनंतरच्या मदत व पुनर्वसन कार्यात स्त्रियांच्या सहभागाकडे व विशेष गरजांकडे पुर्णपणे दुर्लक्ष झाले . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . या विषयी पान क्र. ६

# आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या प्रक्रियेत दिरंगाई व लोकसहभागाचा अभाव

## जनतेची अपेक्षा

- केंद्र शासनाने २३ डिसेंबर २००५ ला आपत्ती व्यवस्थापन कायदा मंजूर केला. २५ जुलै २००५ च्या भीषण आपत्तीच्या पार्श्वभूमीवर २००५ च्या हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र राज्याचा आपत्ती व्यवस्थापन कायदा मांडला जाईल असे आश्वासन मा. मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्यात उद्भवणाऱ्या भिषण आपत्तीची पार्श्वभुमी असताना शासनाने आपत्ती व्यवस्थापन कायद्याविषयी त्वरित कार्यवाही करणे अपेक्षीत होते. आपत्ती व्यवस्थापनामध्ये लोकसहभागाचे अनन्यसाधारण महत्व बघता सदर कायदा करत असताना त्यामध्ये व्यापक लोकसहभाग घेऊन जनहिताच्या दृष्टीने महत्वाच्या कलमांचा समावेश करणे शासनाकडून अपेक्षित होते.

## सद्यस्थिती

- मात्र आजतागायत शासन आपत्ती व्यवस्थापन कायद्याचा मसुदासुध्दा जाहीर करु शकलेले नाही. दरम्यान शासनाने केंद्रिय कायद्यातील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापित करण्याबाबत शासन निर्णय जाहीर केला (अनुक्रमे २४ मे २००६ व १ जून २००६ रोजी शासन निर्णय क्रमांक डि.एम.यु. २००५/ प्र.क्र.७० /डि.एम.–१ आणि क्रमांक डि.एम.यु. २००५ /प्र.क्र.७० / डी.एम.–१). केंद्रिय कायद्यातील ठराविकच कलमांचे मराठी भाषांतर करुन सदर निर्णय लिहिले गेले असतानाही याला इतका वेळ का लागला याचे कारण शासनाने कुठेही स्पष्ट केले नाही. महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणात तीन अशासकीय सभासदांचा समावेश ही स्वागतार्ह बाब असली तरीसुद्धा सदर शासन निर्णयात जनहिताच्या दृष्टीने कित्येक महत्त्वाच्या बाबींचा समावेश नाही.

## मागण्या

धोरणकर्त्यांनी लवकरात लवकर आपत्ती व्यवस्थापन कायदा आमलात आणावा व त्यासाठी पुढील लोकसहभागी प्रक्रिया करावी:

**आपत्ती व्यवस्थापन कायद्याचा मसुदा पुढील (हिवाळी) अधिवेशनाच्या चार महिने आधी (म्हणजे १ ऑगस्टला) जनतेसमोर ठेवावा. समाजातील विविध घटकांच्या प्रतिक्रियांचा त्यामध्ये समावेश करुनच अंतिम कायदा विधानसभा व विधानपरिषदेत मांडला जावा.**

१. जनहिताच्या दृष्टिने महत्त्वाच्या बाबी अंतर्भूत करून सर्वसमावेशक असा महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन कायद्याचा मसुदा जनतेसमोर प्रतिक्रियांसाठी ठेवावा. जनहिताच्या दृष्टिने पुढील कलमे असणे आवश्यक आहे: प्रत्येक प्राधिकरणाने वार्षिक अहवाल जाहीर करणे, सामाजिक लेखा परिक्षण करणे (social audit), राज्य

पातळीच्या प्रधिकरणाप्रमाणे जिल्हा प्राधिकरणामध्ये सुध्दा अशासकीय प्रतिनिधींना कायमस्वरुपी सदस्यत्व राखून ठेवणे, विविध आराखडे व निर्णयांमध्ये व्यापक व अर्थपूर्ण लोकसहभाग घेणे.

२. सदर प्रत जनतेच्या विचारार्थ व प्रतिक्रियांसाठी उपलब्ध असल्याची बातमी विविध प्रसार (राज्य व स्थानिक पातळीवरील) माध्यमांद्वारे जाहीर करावी. इंटरनेट व इतर माध्यमांद्वारे सदर मसुद्याची प्रत उपलब्ध असावी.

३. सदर मसुद्यावर लेखी प्रतिक्रिया योग्य पत्त्यावर (पोस्ट, इमेल, प्रत्यक्ष) मागवावी तसेच मिळालेल्या सर्व प्रतिक्रियांची पोच द्यावी.

४. अशासकीय व्यक्तींचा गट किंवा संस्थेमार्फत मिळालेल्या विविध प्रतिक्रियांचे विश्लेषण करावे व त्यावर आधारित एक अहवाल जाहीर करावा.

५. जनतेच्या प्रतिक्रिया व प्रमुख सूचनांचा समावेश करुन ''लोकाभिमुख आपत्ती व्यवस्थापन कायद्याचा'' अंतिम मसुदा विधानसभा व विधानपरिषदेत मंजुरीसाठी मांडण्यात यावा.

**आपत्ती व्यवस्थापनाचे यश हे संपूर्णपणे लोकसहभागावर आधारित आहे हे २००५ च्या आपत्तीनंतर चांगलेच कळून आले आहे. लोकसहभागाची सुरवात आपत्ती व्यवस्थापनाच्या धोरणातील सहभागापासूनच सुरू होणे गरजेचे आहे. अन्यथा पुन्हा एकदा जनहिताच्या दृष्टीने अनेक त्रुटी असलेला शासन निर्णय/कायदा तयार होईल.**

# भात शेतीचे पुनर्वसन

## जनतेची अपेक्षा

- २००५ च्या अतिवृष्टी व पुरामुळे भात शेतीचे झालेले नुकसान रोजगार हमी योजनेद्वारे भरून काढणे अपेक्षित होते. प्रस्ताव तयार करण्याची व ते मंजूर करण्याची पद्धत सुलभ व लोकसहभागी पद्धतीने केल्यास आपत्तीग्रस्तांना वेळेत मदत पोहचणे अपेक्षित होते.
- शेत जमीन पुरात वाहून जाणे किंवा दरडीखाली बुजून जाणे, यासारखे शेत जमिनीचे कायमस्वरुपी नुकसान झालेल्या आपत्तीग्रस्तांना शासनाने नवीन जमीन विकत घेण्यास मदत करणे अपेक्षित होते.

## सद्यस्थिती

- शासनाच्या गलथान व अकार्यक्षम कारभारामुळे २००६ चा पावसाळा उजाडला तरी भात शेतीच्या दुरुस्तीच्या कामात शेतकऱ्यांना शासनाची काडीचीसुद्धा मदत झाली नाही. शासनाने रोजगार हमीद्वारे भात शेतीच्या दुरुस्तीचे फक्त धोरण (२५ ऑक्टोबर २००५ चा शासन निर्णय, क्र. रोहयो–१००५/ प्र.क्र.१८९ /रोहयो–६) जाहीर केले. मात्र नेहमीप्रमाणे जी. आर. मधील विविध त्रुटी व लोकसहभागी पद्धतीने धोरण राबवण्याची टाळाटाळ यामुळे निर्णयाची अंमलबजावणी कोकणातील अनेक गावांमध्ये लोकांना गरज असताना सुध्दा होउ शकली नाही.
- भात शेतीचे पूर्णपणे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी अतिशय तुटपुंजी मदत जाहीर केली गेली. शासनाची तुटपुंजी मदत सुद्धा अनेक शेतकऱ्यांपर्यंत पोहचली नाही. भात शेती नष्ट झाल्याने कोकणातील लोकांच्या मुंबई व इतर शहरांकडे होणाऱ्या स्थलांतराच्या प्रमाणात अधिक वाढ होण्याची चिन्हे दिसत आहेत.

## मागणी

**भातशेतीच्या पुनर्वसनाचा नियोजनबध्द व व्यापक कार्यक्रम शासनाने वेळापत्रकासह जाहीर करावा.**

१. भात शेती दुरुस्तीच्या धोरणामध्ये योग्य त्या सुधारणा करावेत. धोरणामध्ये लोकसभागी पध्दतीने प्रस्ताव तयार करण्यासारख्या लोकाभिमुख व सुलभ अटींचा समावेश करावा व उर्वरित शेती दुरुस्तीचे काम त्वरित हाती घ्यावे. धोरणाच्या अंमलबजावणीसाठी नेमलेल्या अधिकाऱ्यांना यासाठी पुर्णपणे जबाबदार धरावे. कुटूंबाच्या पोटासाठी भात व इतर अन्नधान्य पिकवणाऱ्या ज्या शेतकऱ्यांच्या शेतजमीनी पुर्णपणे उध्वस्त झाल्या अशा आपत्तीग्रस्तांना शासनाने पुनर्वसनाच्या दृष्टीने जमिनीच्या बदल्यात जमिन देण्याचे धोरण जाहीर करावे.

# बेघर झालेल्यांचे पुनर्वसन

## जनतेची अपेक्षा

- अतिवृष्टीमुळे घरांचे मोठे नुकसान होऊन बेघर झालेल्या सर्व कुटुंबांचे २००६ च्या पावसाआधी नवीन व सुयोग्य घरांमध्ये पुनर्वसन होणे अपेक्षित होते.

## सद्यस्थिती

- शासन पुनर्वसनाचे काम पूर्ण करण्यात अपयशी ठरले. अनेक गावांमध्ये पंचनामे झाले. शासनाने त्यावर आधारित पुनर्वसनाचे आराखडे तयार केले. मात्र प्रत्यक्षात अनेक भागांमध्ये आजही आपत्तीग्रस्त लोकांचे आणि विशेषतः आदिवासी व इतर गरीब कुटुंबांचे पुनर्वसन झालेले नाही. अनेक कुटुंबे यंदाचा पावसाळा प्लास्टिकच्या कागदाचा आसरा घेऊन काढत आहेत. डोंगरात राहणाऱ्या आदिवासी कुटूंबांचे नुकसान पुरामुळे नसून अतिवृष्टीमुळे झाले असल्यामुळे त्यांचे पंचनामेच करुन घेतलेले नाहीत. अनुषंगाने अशा अनेक गरजू कुटुंबांना शासनाने मदत नाकारली आहे. शासनाकडून पुनर्वसन न झाल्यामुळे अनेक कुटुंबांनी मजुरीच्या शोधात शहरांकडे धाव घेतली आहे.

## मागण्या

१. शासनाने पुनर्वसनाचे जे आराखडे जाहीर केले, त्यावर झालेल्या कार्यवाहीचा परिपूर्ण अहवाल जाहीर करावा.

२. पुनर्वसन न झालेल्या गावांमध्ये त्वरित पुनर्वसनाचा कार्यक्रम वेळापत्रकासह जाहीर करावा.

३. घराचे नुकसान हे पुरामुळे नसुन आतिवृष्टीमुळे झाल्याने ज्या आदिवासी व इतर गरीब कुटुंबांचे पंचनामे झाले नसतील अशा कुटुंबांचे नव्याने पंचनामे करून त्यांना पुनर्वसन आराखड्यात समाविष्ट करावे.

# आपत्तीमागच्या मूळ कारणांवर कायमस्वरुपी उपाय

## जनतेची अपेक्षा

- कोकणात दरडी कोसळण्याच्या व अनपेक्षित ठिकाणीदेखील पूर येण्यामागच्या मूळ स्थानिक कारणांची शासनाने गांभीर्याने दखल घेणे अपेक्षित होते. मुळात आपत्तीची तीव्रता कोणकोणत्या मानवी हस्तक्षेपांमुळे वाढली व यावर कोणती कारवाई करणे गरजेचे आहे, याचा तपशील असलेला अहवाल आपत्तीवर कायमस्वरुपी उपायांचा पाठपुरावा करण्यासाठी जनतेसमोर ठेवणे गरजेचे होते. रेल्वे, रस्ते, इमारतींसारख्या बांधकामांमुळे आपत्तीची व नुकसानीची तीव्रता वाढल्याचे ठळक पुरावे उपलब्ध असलेल्या ठिकाणी संबंधित बांधकामधारकांवर शासनाने त्वरित कारवाई करणे अपेक्षित होते.

## सद्यस्थिती

- अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाची तीव्रता वाढविणाऱ्या स्थानिक कारणांचा कोकणातील भागासाठी कुठलाही पाठपुरावा शासनाने केला नाही. रेल्वेलाईन, रस्ते, औद्योगिक वसाहतींचे बांधकाम कोकणातील नाजूक नैसर्गिक परिस्थितीला अनुसरून नसल्यामुळे अनेक गावांमध्ये अतिवृष्टीतून नुकसानाची तीव्रता वाढल्याचे दिसते. अनेक गावांत ग्रामस्थांनी संबंधित बांधकामधारकांविरुद्ध आवाज उठविला. मात्र संबंधित बांधकामधारकांनीच नव्हे, तर शासनानेदेखील ग्रामस्थांच्या म्हणण्याकडे पूर्णपणे डोळेझाक केली. आपत्तीग्रस्त ग्रामीण भागातील जनतेवर हा अन्याय आहे, असे लोकांचे म्हणणे आहे.

## मागण्या

१. शासनाने आपत्तीच्या मूळ स्थानिक कारणांचा 'कोकण–विभागीय' अभ्यास करण्यासाठी त्वरित समिती स्थापन करावी. समितीने कोकणातील विविध ठिकाणच्या आपत्तीग्रस्त लोकांशी मुलाखती व चर्चेनंतर शासनाला अहवाल सादर करावा.

२. रेल्वे, रस्ते व औद्योगिक वसाहतींमुळे आपत्तीकाळात नुकसानाची तीव्रता वाढल्याचे ठोस पुरावे असलेल्या ठिकाणी शासनाने संबंधित बांधकामधारकांवर कठोर कारवाई करावी.

३. संबंधित बांधकामधारकांनी झालेल्या नुकसानाची पुरेपूर नुकसानभरपाई ग्रामस्थांना द्यावी. तसेच पुढील काळात नुकसान होऊ नये म्हणून कायमस्वरुपी, स्थानिक नैसर्गिक रचनेला अनुसरून व लोकांचा अर्थपूर्ण सहभाग घेऊन उपाय–योजना करावी.

# आपत्ती काळात स्त्रियांच्या सहभाग व विशेष गरजा

## जनतेची अपेक्षा

- आपत्तीच्या काळात घर व कुटुंब चालविण्याची सर्व जबाबदारी स्त्रियांवर येऊन पडते. स्त्रियांवर जास्तीचे पडणारे कष्ट, ताण–तणाव तसेच स्त्रियांच्या वेगळ्या व दुर्लक्षित राहिलेल्या गरजा लक्षात घेऊन शासनाने आपत्तीनंतरच्या मदत व पुनर्वसन कार्यात स्त्रियांचा सहभाग घेण्याकरिता विशेष प्रयत्न करणे अपेक्षित होते.

## सद्यस्थिती

- आपत्तीकाळात शासनाने स्त्रियांच्या सहभागाकडे व त्यांच्या विशेष गरजांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. शासकीय अधिकाऱ्यांनी पंचनामे करताना गावातील स्त्रियांच्या सहभागाचा आग्रह धरला नाही. काही गावांमध्ये पंचनाम्याची प्रक्रिया गावात वा वस्तीत न घेता, तलाठी कार्यालयात घेतल्यामुळेही स्त्रियांच्या सहभागावर मर्यादा आल्या. पूर व दरडीमुळे बेघर झालेल्या कुटूंबांसाठी योजलेल्या निवाऱ्यांमध्ये तात्पुरत्या स्त्रियांच्या विशेष गरजांकडे दुर्लक्ष झाले. स्त्रियांच्या विशेष गरजांकडे लक्ष देण्यासाठी, तसेच त्यांचा सहभाग घेण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याइतकीदेखील संवेदनशीलता शासन दरबारी नाही.

## मागणी

१. शासनाने आपत्ती व्यवस्थापनातील विविध टप्प्यांमध्ये स्त्रियांचा सहभाग व त्यांच्या विशेष गरजांना प्राधान्य दिले जाईल अशी यंत्रणा उभी करावी. आपत्तीच्या काळातील स्त्रियांच्या समस्या व विशेष गरजा कशा प्रकारे भागविल्या जातील यावर शासनाने नेमके धोरण जाहीर, करावे व ते त्वरित अंमलात आणावे.